## अमेरिकेत ग्रीन कार्ड मिळवून देणारे सद्‌गुरु अनिरुद्धच!

*– मिलनवीरा नामले, कॅलिफोर्निया*

---

'आता कैची अमावास्या, नित्य अनिरुद्ध पौर्णिमा'! हे मीनावैनींच्या (मीनाताई दाभोळकर) अभंगातील शब्द ह्या श्रद्धावान स्त्रीने प्रत्यक्ष अनुभवले असे त्याच त्यांच्या अनुभवामध्ये नमूद करतात. अमेरिकेसारख्या देशात सद्‌गुरु अनिरुद्धांनी त्यांच्या लीलेने ह्या श्रद्धावान स्त्रीला आधार देऊन, तिची जटील समस्या कशी सोडवली, हे सांगणारा हा एक हृदयस्पर्शी अनुभव.

---

हरि ॐ. सद्‌गुरु अनिरुध्द बापू त्यांच्या श्रद्धावान बाळांची नेहमीच काळजी घेत त्यांना मदत करतच असतात. प्रत्येक भक्ताचे इच्छित काम पूर्ण करण्यासाठी बापू सर्व परिस्थितीवर मात करून त्या भक्ताच्या हाकेला कसा प्रतिसाद देतात, हे मी माझ्या पुढील दोन अनुभवांतून सर्वांना सांगणार आहे.

दिवाळीतील, धनत्रयोदशी २०१७च्या दिवशी दिवाळी स्नेहसंमेलनासाठी आम्ही एका भारतीय कुटुंबाच्या घरी गेलो होतो. देवाच्या पूजेसाठी त्यांनी ३५० डॉलर्स (साधारण रु.२४,५००/-) ची कमळाची फुले आणली होती, असे गप्पांच्या ओघात ते म्हणाले. आम्ही सगळे भारतातील कमळ, मोगरा, निशिगंधा ह्या सारख्या फुलांची आठवण काढत चर्चा करत होतो. परदेशात क्वचितच आम्हाला ही फुले दिसतात.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी बापूंवरील अभंग ऐकत नेहमीप्रमाणे दिनचर्या सुरु केली. अभंग ऐकता ऐकता मला आपल्या कर्जत मधल्या गोविद्यापिठम्‌ची खूप आठवण झाली. तिथली पारिजातकाची फुलेही आठवली. मी बापूंना लगेच म्हटले, 'बापू आज जर मी गोविद्यापिठम्‌मध्ये असते तर तुमच्या चरणी भरपूर पारिजातकाची फुले वाहिली असती. पण अमेरिकेत ही कुठे मिळणार?' हा विचार मनात येताच मलाच हसू आले आणि मी तो विचार मनातून काढून टाकला.

आमच्या घरी अमेरिकेला ८ ते ९ प्रकारचे सुंदर गुलाब, २ ते ३ प्रकारच्या जास्वंदी, ४ ते ५ सदाफुली, राणी रंगाची तुळस आणि अनेक वेगवेगळी फुलेझाडे आहेत. तरीही त्या दिवशी परिजातकाची खूपच ओढ लागली होती.

...आणि जसे अभंग संपत आले, तशी मुख्य दारावरची बेल वाजली. आमच्या परिसरात आजूबाजूच्या बंगल्यांमध्ये सर्व अमेरिकन्सच राहतात. अमेरिकेत भारतासारखा माणसा माणसांतील जिव्हाळा नसतो. तिथे कोणीही कोणाच्या घरी क्वचितच जातात. त्यामुळे अशा सकाळच्या वेळी हे कोण असेल, हा विचार करतच मी दरवाजा उघडला. तर आमच्या समोरच्या बंगल्यात राहणारी माझी बांगलादेशची एक मैत्रीण हातात डिस्पोजेबल बाऊल अतिशय सांभाळत घेऊन उभी होती. मला म्हणाली, "मी खूप काळजी घेतली आहे ह्या झाडाची. ते अगदी माझ्या बाळासारखे आहे. आज त्याला खूपच बहर आल्याने मला अचानक हे तुम्हाला द्यावेसे वाटले". असे म्हणून तिने त्या बाऊलचे झाकण उघडले...आणि पाहते तर काय! बर्फाच्या लादीवर सुंदर टवटवीत पारिजातकाची फुले होती!

बापूंची ही सुंदर हृदयस्पर्शी लीला अनुभवली आणि डोळ्यांतून प्रेमाश्रु वाहू लागले. मी ती पारिजातकाची फुले माझ्या बापूरायाला वाहून धन्य झाले. मी काय वाहणार त्या बापूरायाच्या चरणी? त्यानेच मला फुले आणून दिली आणि स्वत:च्या चरणी माझ्याकडून वाहून घेतली.

माझे तरी काय असे, सर्व तुझेची रे देवा ।
तुझे असो तुझ्या पाशी, मीच होय तुझा ।।

– आद्यपिपादादा

मी अगोदर म्हटल्यानुसार अमेरिका ह्या देशात कोणीही कोणाकडे कामाशिवाय जात नाही. इथे १२ वर्षे राहूनही शेजारच्या बंगल्यात कुठली झाडे आहेत हे देखील मला माहित नव्हते. पण सातासमुद्रापलिकडे माझ्या बापूरायाला ते ज्ञात होते. म्हणूनच माझ्या समोर राहणाऱ्या त्या स्त्रीला बुद्धी झाली मला ती फुले देण्याची! बापूंनी माझी इच्छा पूर्ण केली होती.

माझी अजून एक इच्छा बापूंच्याच कृपे पूर्ण झाली. ६ सप्टेंबर २०१८ला मी आणि माझे पति निलेशसिंह ह्यांनी कॅलीफोर्नियाच्या ग्रीन कार्ड साठी अर्ज केला. त्याच सुमारास 'एच १-बी' व्हिसाचे नवनवीन नियम येत होते. आमच्या ओळखीची अनेक कुटुंबे त्यामुळे भारतात परतत होती कारण अमेरिकेतील ग्रीन कार्ड मिळण्याची प्रक्रीया खूपच हळूहळू पुढे सरकत होती. आम्ही २१ नोव्हेंबरची भारतात परतण्यासाठीची तिकिटे काढली होती. आम्हाला कसेही करून २३ नोव्हेंबरच्या अनिरुद्ध पौर्णिमेला भारतात यायचे होते. त्या आधी ग्रीन कार्ड मिळणे आमच्यासाठी आवश्यक होते.

मग एका गुरुवारी, 'नाहू तुझिया प्रेमे-२' ह्या महासत्संगाची तारीख ३१ डिसेंबर २०१९ असेल अशी श्रीहरिगुरुग्राम येथे सूचना करण्यात आली. तसेच माझ्या अमेरिकेत राहणाऱ्या दोन नातवंडांची मुंज रत्नागिरीत २८ डिसेंबर २०१८ला करण्याचे योजले होते. आता ऑक्टोबर २०१८ महिना सुरु झाला होता. अमेरिकन खात्याने ग्रीनकार्ड बाबत अद्यापही कुठलीच सूचना दिलेली नव्हती. भारतातून अमेरिकेत सारखी जा-ये करण्यासाठी ग्रीनकार्डची आवश्यकता होती. अमेरिकेत आमचा प्रत्येक क्षण अतिशय काळजीत जात होता.

आमच्या दृष्टीने हे तीनही कार्यक्रम, म्हणजे २०१८ची अनिरुद्ध पौर्णिमा, २०१९चा महासत्संगाचा कार्यक्रम आणि माझ्या नातवंडांची मुंज, ह्या तीनही गोष्टी अतिशय आनंदाच्या आणि महत्वाच्या होत्या. हळूहळू काळ हातातून निसटत चालल्याची स्पष्ट जाणीव होत होती. शेवटी ४ ऑक्टोबरला आमचा धीर सुटला आणि आम्ही भारतात हॅपी होमच्या क्लिनिकमध्ये फोन करून सुचितदादांना आमची समस्या सांगितली.

मुख्य म्हणजे विमानाच्या तिकिटांचे पूर्ण पैसेही भरून झाले होते. मग आमच्या एका श्रद्धावान मित्राच्या सल्ल्यानुसार आम्ही लगेचच बापूंच्या फोटो समोर उभे राहिलो. मनातील इच्छा बापूंना सांगितल्यावर खरंच मन खूप हलके झाल्यासारखे वाटले. सातासमुद्रापलिकडे असूनही, फोटोतून बापूंनी आम्हाला आधार दिला. बस्स! त्याच क्षणापासून आमची सर्व चिंता, काळजी तात्काळ संपलीच.

आता नोव्हेंबर महिना सुरु झाला होता आणि २१ नोव्हेंबर तर आमची भारतात निघण्याची तारीख होती. म्हणजे फक्त २१ दिवसच उरले होते. जर मी बापूंकडे नसते तर कदाचित मी इतकी अस्वस्थ झाले असते की लगेचच तिकिटे रद्द करायला लावली असती. पण बापू भक्तिने मला स्थैर्य, धैर्य आणि सबूरी प्राप्त झाली होती. बापू आपल्यासाठी काहीतरी करतीलच ह्या विश्वासाने मी शांत होते.

बापू आम्हाला नक्कीच योग्य वेळी भारतात पाठवतील ह्या विश्वासाने मनाला एक नवीनच उभारी आलेली होती. ह्या ओघातच एकदा अमेरिकेत असलेल्या मेघनावीरांशी बापूंच्या गुणसंकीर्तना विषयी बोलत असताना मी त्यांना सांगूनही टाकले, ''मेघनावीरा, तुम्ही थोडे दिवस थांबा. तुम्हाला मी बापूंचा एक जबरदस्त अनुभव

सांगणार आहे.'' ह्यानंतर आम्हाला अमेरिकन खात्याकडून ९ नोव्हेंबर ही तारीख ग्रीन कार्डच्या मुलाखतीसाठी मिळाली. आमची मुलाखत झाल्यावर तिथल्या अधिकाऱ्यांनी सांगितले, ''तुम्हाला १२० दिवसांनी तुमच्या ग्रीन कार्ड संबंधी कळवण्यात येईल. त्यानुसार तुम्हाला एक पत्रही पाठवले जाईल''. बापरे! इथे हातात तर फक्त १२ दिवसच होते आणि हे १२० दिवसांची गोष्ट करत होते! शिवाय ११ नोव्हेंबरला 'वेटरन्स डे'ची अमेरिकेत सुट्टी होती आणि तो संपूर्ण पुढचा आठवडा 'थॅन्क्स गिव्हींग डे'ची (परमेश्वरी कृपादृष्टीबद्दल आभार दर्शन प्रार्थना) सुट्टी होती. म्हणजे आता तर वेळ संपल्यातच जमा होती.

तरीही आम्ही तिकिटे रद्द केली नाही. आम्हाला पूर्ण विश्वास होता की आमचे 'डॅड' आमच्यासाठी नक्कीच काहीतरी करणार...आणि खरोखर सांगते की आमचा हा विश्वासच खरा ठरला. १७ नोव्हेंबरला एक गोरा पोस्टमन घरी आला आणि त्याने दोन पाकिटे माझ्या हातात दिली. हे नक्कीच ग्रीन कार्डचे मंजूर पत्र असावे ह्या आनंदात आम्ही अगोदर ती पत्रे बापूंच्या फोटोसमोर उभे राहून त्यांच्या हाताला लावली. त्यांना मनोभावे नमस्कार करून ती पाकिटे उघडली. त्यात बघतो तर काय! आमची ग्रीन कार्डस् आली होती! म्हणजेच मंजूरी पत्राच्या (ॲप्रुव्हल लेटर) अगोदरच ग्रीन कार्डस् आमच्या हातात होती. अमेरिकेसारख्या देशात ही एक अशक्यप्राय गोष्ट होती. आमचा आनंद गगनात मावेना. 'डॅड'च्या प्रेमाच्या खेळापुढे फक्त प्रेमाश्रु वाहण्यापलिकडे आमच्या हातात काहीच नव्हते.

मग १९ नोव्हेंबरला सामाजिक सुरक्षिततेसाठी (सोशल सिक्युरिटी) आमची एक मुलाखत झाली. ह्या सर्व औपचारिकता पूर्ण करून आम्ही घरी आलो. घरी आल्यावर बघतो तर ग्रीन कार्ड्चे मंजूर पत्र आमची वाट बघत होते. ग्रीन कार्ड्स मिळाल्यानंतर त्याचे मंजूर पत्र घरी आले होते. आता ह्याला काय म्हणावे? आम्ही २१ नोव्हेंबरला अमेरिकेहून निघून भारतात आलो आणि अनिरुध्द पौर्णिमेच्या मायेच्या चांदण्यात न्हाऊन निघालो. मला 'वैनी म्हणे' ह्या अभंगमाळेतील एक अभंग आठवला,

आता कैची अमावास्या ।
नित्य अनिरुद्ध पौर्णिमा ।।

आम्ही त्या नित्य अनिरुद्ध पौर्णिमेचा आनंद उपभोगला होता. ९ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर दरम्यान बापूरायाने आमच्यासाठी काय केले, हे शब्दांत व्यक्त करणे खूपच कठीण आहे. आम्हाला जे हवे होते ते सर्वकाही सद्‌गुरुंनी आम्हाला सहजतेने प्राप्त करून दिले.

आमचे बापू सातासमुद्रापलिकडेही आमच्या भावनांच्या, इच्छेच्या किती जवळ होते! बापूरायाने आमच्यासाठी काळ, स्थळ आणि दिशेलाही वाकवले होते. त्यांनी आम्हाला अगदी सहजतेने त्यांच्या अमाप प्रेमाचा अनुभव दिला होता. आम्ही बापूंच्या चरणी नतमस्तक होऊन धन्य धन्य झालो.

हरि ॐ श्रीराम अंबज्ञ
नाथसंविध्